महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ 27 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 269 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मर्सिडीज गाड्यांमधून फिरतात मजूर संस्थांचे अध्यक्ष !

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बड्या राजकीय नेत्यांना फटकारले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मजूर संस्थांचे अध्यक्ष मजूर असणे अपेक्षित आहे. पण ते आता मर्सिडीज गाड्यांमधून फिरत आहेत. मजूर संस्थांचे अध्यक्ष मर्सिडीजमधून आले कुठून याचाही आपल्याला विचार करावा लागेल. मजूर संस्थांचा दुरुपयोग होणार नाही आणि खऱ्या मजूर संस्थांना कामे मिळतील, अशा प्रकारचा प्रयत्न करण्याच्या सूचना कामगार विभागाला दिल्या आहेत, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बड्या राजकीय नेत्यांना आज फटकारले.

सिंधुदुर्ग जिह्यातील ओरोसमधील जिल्हा उपनिबंधक व कार्यालय अधीक्षकांना लाच घेताना रंगेहाथ पकडल्याच्या संदर्भात शिवसेना आमदार वरुण सरदेसाई यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या अनुषंगाने त्यांनी मजूर संस्थांची कामे सुशिक्षित बेरोजगार व तरुणांना कामे मिळत नाहीत, ठराविक कंत्राटदारांना कामे मिळतात, अशा शब्दांत वरुण सरदेसाई यांनी नाराजी व्यक्त केली.

यावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आपल्याला भ्रष्टाचार, अकार्यक्षमता संपवायची असले तर सर्वांवर 'डिजिटायझेशन' हा एकमेव उपाय आहे. उपनिबंधकांच्या कार्यालयातील सर्वांना व सहकार आयुक्तांना सांगितले आहे की, पुढील तीन महिन्यांत डीम कन्व्हेअन्स, नोंदणीची प्रक्रिया, सुनावणी ऑनलाइन झाली पाहिजे. त्यासाठी कोणीही ऑफिसला जाणार नाही. या सर्व प्रक्रिया ऑनलाइन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

पहिल्या टप्प्यात ऑनलाइन व दुसऱ्या टप्प्यात पुढील सहा महिन्यात 'मेटा' सोबत करार केला आहे. त्यानुसार आपण 'व्हॉटसअॅप गव्हर्नन्स' करीत आहोत आपल्या सर्व सेवा व्हॉटसअॅपच्या माध्यमातून उपलब्ध करून देणार आहोत. कारण अनेकजणांना व्हॉटसअॅप वापरता येते. पण ऑनलाइन करता येत नाही. पैसेही भरण्याची सुविधा उपलब्ध होईल. यात मानवी हस्तक्षेप कमी होईल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.




# अधिवेशनाचे सूप वाजले

## विविध मुद्यांनी गाजलं अर्थसंकल्पीय अधिवेशन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई: राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस असून, मागील 23 दिवसांत अनेक महत्त्वाचे निर्णय आणि घोषणा झाल्या. मात्र, काही मोठ्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. महायुती सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पाकडे सर्वसामान्यांचे मोठे लक्ष होते. परंतु काही महत्त्वाच्या योजनांची पूर्तता न झाल्याने निराशा व्यक्त केली जात आहे.**

### अधिवेशनात झालेल्या ठळक घोषणा

- मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-1 ची कामे पूर्णत्वास आली आहेत. टप्पा-2 अंतर्गत 9 हजार 610 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या दर्जोन्नतीची कामे मार्च, 2026 अखेर पूर्ण करण्याचं नियोजन आहे.
- 'सर्वांसाठी घरे' हे उद्दिष्ट येत्या पाच वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. राज्य शासनाकडून या योजनेच्या अनुदानात 50 हजार रुपयांची वाढ करण्यात येणार आहे. या सर्व घरकुलांच्या छतावर सौर उर्जा संच बसविण्यात येणार आहे.
- कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे धोरण आखण्यात येत आहे. शेतकऱ्यांना पीक नियोजनाचा सल्ला देणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, दर्जेदार शेतमालाचे उत्पादन तसेच शेतमालाला हक्काची व शाश्वत बाजारपेठ मिळवून देणे यासाठी शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रात उपयुक्त असलेल्या प्रणाली शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात 50 हजार शेतकऱ्यांच्या एक लाख एकर क्षेत्राला त्याचा फायदा होईल. येत्या दोन वर्षात त्यासाठी 500 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता स्टील हब म्हणून उदयास येत असल्याची घोषणा करण्यात आली.
- जलयुक्त शिवार अभियान 2.0 अंतर्गत 5 हजार 818 गावांमध्ये 4 हजार 227 कोटी रुपये किंमतीची 1 लाख 48 हजार 888 कामे हाती घेण्यात आली आहेत. अभियानातील सर्व कामे मार्च, 2026 पर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.
- नदीजोड प्रकल्पा अंतर्गत वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास तत्वत: मान्यता देण्यात आली. या प्रकल्पाचा लाभ नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोल आणि बुलढाणा या सहा जिल्ह्यांना होणार आहे. प्रकल्पाची सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे सुरू
- महाराष्ट्रातील आगामी विमानतळांचे धोरण : शिर्डी विमानतळाच्या 1 हजार 367 कोटी रुपये किंमतीच्या विकास कामांना मान्यता देण्यात आली असून ती कामे सुरु आहेत. रत्नागिरी विमानतळाची 147 कोटी रुपये रकमेची कामे प्रगतीपथावर आहेत. अमरावतीतील बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झाले असून तेथून 31 मार्च, 2025 पासून प्रवासी सेवा सुरु करण्याचे नियोजन आहे.
- अनुसूचित जाती उपयोजनेच्या तरतुदीत 42 टक्के भरीव वाढ केल्याची घोषणा करण्यात आली.
- महावितरण कंपनीने येत्या 5 वर्षांसाठी वीजेचे दर निश्चित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केला आहे.
- नवीन पिढीला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच नव-उपक्रमांमध्ये राज्य अग्रेसर व्हावे, यासाठी नवी मुंबई येथे 250 एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर, इनोव्हेशन सिटी, उभारण्यात येणार आहे.
- वाढवण येथे तिसरे विमानतळ जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण आणि महाराष्ट्र सागरी मंडळ हे संयुक्तरित्या पालघर जिल्ह्यात 'वाढवण बंदर' विकसित करित आहेत. या प्रकल्पाचा एकूण खर्च 76 हजार 220 कोटी रुपये असून त्यात राज्य सरकारचा सहभाग 26 टक्के आहे.

**थोडक्यात महत्वाचे**

# उंबर्डे कचराभूमीला भीषण आग

## दूरवर उसळले धुराचे लोट




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: कल्याण-डोंबिवली मनपाच्या उंबर्डे येथील कचरा प्रकल्पातील कचऱ्याने मंगळवारी दुपारच्या सुमारास अचानक पेट घेतला. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. त्यामुळे परिसरात धुराचे लोट उसळल्याची घटना घडली. उंबर्डे कचरा प्रकल्पात कचऱ्याने पेट घेतल्याची घटना दुपारी पावणे तीनच्या सुमारास घडली. यामुळे परिसरात धुराचे लोट उसळले. वातावरणातील उष्णता आणि धुराचे लोट उसळल्याने परिसरातील वातावरण धुरमय झाले. आगीची माहिती मिळताच कल्याण-डोंबिवली मनपाच्या अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या सहा गाड्या आणि पाण्याचे टँकर घटनास्थळी दाखल झाले. तीन तासाच्या अथक प्रयत्नांतर आगीवर नियंत्रण मिळवण्यास अग्निशमन विभागाला यश आले आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी कुलिंग ऑपरेशन सुरू केले. आगीचे कारण मात्र अद्याप अस्पष्ट असल्याचे मुख्य अग्निशमन आधिकारी नामदेव चौधरी यांनी सांगितले.

# उल्हासनगरात १८ बोगस डॉक्टरांवर गुन्हा

## महापालिकेची धडक कारवाई

## बोगस डॉक्टरांची यादीही जाहीर




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील १८ बोगस डॉक्टरांवर उल्हासनगर महापालितेच्या आरोग्य विभागाच्या पुढाकाराने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उल्हासनगर महापालिका क्षेत्रात २६ बोगस डॉक्टरांची यादी जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली होती. पालिकेच्या आरोग्य विभागाने केलेल्या पडताळणीत त्यातील चार दवाखाने बंद असल्याचे दिसून आले तर तीनच डॉक्टर महाराष्ट्र आरोग्य परिषदेकडे नोंदणीकृत असल्याचे दिसून आले. त्यामुळे पालिका प्रशासनाने पडताळणीअंती १८ जणांवर विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील बोगस डॉक्टरांचा प्रश्न काही दिवसांपूर्वी समोर आला होता. याप्रकरणी एका डॉक्टरवर गुन्हाही दाखल झाला होता. त्याचवेळी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील एकुण २६ डॉक्टरांची यादी उल्हासनगर महापालिकेला देण्यात आली होती. त्यानुसार उल्हासनगर महापालिकेने अशा डॉक्टरांची तपासणी सुरू केली होती. त्याअंतर्गत बोगस कागदपत्रे असलेल्या डॉक्टरांवर पडताळणी करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार उल्हासनगर महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा आणि त्यांच्या पथकाने पडताळणी केली होती. त्यावेळी शहरातील अनेक डॉक्टर वैद्यकिय परवाना नसताना आणि अपात्रेसह वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे आढळून आले होते. अशा बोगस डॉक्टरांच्या कागदपत्रांची पाहणी करुन त्यामध्ये आढळून आलेल्या एकुण १८ डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे. त्यानुसार पोलिसांकडून आता पुढील कार्यवाही सुरु आहे. पालिका प्रशासनाने या डॉक्टरांची यादी जाहीर केली आहे. अशा बेकायदेशीर डॉक्टरांकडून उपचार घेवू नये आणि संशयास्पद वैद्यकिय व्यवसायाबाबत त्वरीत प्रशासनाला कळवावे, असे आवाहन नागरिकांना केले आहे. तसेच वैध वैद्यकिय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांनी आवश्यक परवानग्या अद्ययावत ठेवाव्यात अन्यथा कठोर कार्यवाही करण्यात येईल, असा इशाराही डॉक्टरांना दिला आहे.

महापालिकेला प्राप्त यादीनुसार २६ डॉक्टरांपैकी एकुण १८ बोगस डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. उर्वरित ०८ डॉक्टारांपैकी ०३ डॉक्टर महाराष्ट्र आरोग्य परिषदेकडे नोंदणीकृत आहेत. तर ०४ डॉक्टरांच्या दवाखान्यांची पाहणी केली असता त्या ठिकाणी त्यांचे दवाखाने बंद असल्याचे आढळून आले. तर एक डॉक्टर कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात येत असल्याने त्या डॉक्टरवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे, अशी माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे.

# शहापूर तालुक्यात ३३ टँकरची गरज

## आठ गावे, ४५ पाडे पाण्याविना तहानलेले




**पाणीपुरवठ्याच्या विविध ययोजनांचा आराखडा तयार आसून ह्या प्रस्तावित योजनाकामी १५ कोटी ४७ लाख ७० हजार रुपये खर्च अपेक्षित आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर तालुक्यातील दरवर्षी फेब्रुवारी ते जूनपर्यंत मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई जाणवते. तालुक्यातील गाव-पाड्यांत निर्माण होणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईची समस्या सुटावी, यासाठी पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाने यापूर्वी पाणीटंचाई आराखडा तयार करून मंजुरीसाठी प्रस्तावित केला आहे. त्यानुसार पाणी टंचाईवर उपाय योजना केल्या जात आहेत. तालुक्यात ३३ टँकरची मागणी ही टंचाईची समस्या सोडविण्यासाठी या गाव-पाड्यांत सरकारी पातळीवरून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. पाणीटंचाई म्हणून मंजुरीसाठी प्रस्तावित असलेल्या २४ गावे व ११६ पाडे यासाठी एकूण ३३ टँकरची मागणी असून, या अनुषंगाने सध्या मिळालेल्या मंजुरीनुसार तालुक्यातील १६ गावे, ७१ पाड्यांना २९ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केल्याची माहिती सुत्रांकडून सामोर आली असून पंचायत समिती स्तरावर दोन गावे व आठ पाड्यांसाठी दोन टँकर प्रस्तावित आहेत.




# रखडलेल्या पुनर्विकासाला चालना

## शिंदेंच्या निर्णयामुळे नवी मुंबईकरांना दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबईमध्ये साडेबारा टक्के योजनेअंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या भूखंडधारकांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. या भूखंडावरील विकास तसेच पुनर्विकासाला चालना मिळण्यासाठी इमारतीच्या अनुज्ञेय उंचीमधून स्टिल्ट पार्कींगची उंची वगळण्यात आली आहे. या तरतुदीचा समावेश आता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये (युडीसीपीआर) तातडीने लागू करण्यात येत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात केली. नवी मुंबईच्या विकासासाठी स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या जमीनी सिडकोला दिल्या आहेत. सरकारच्या धोरणानुसार अशा प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या स्वतःच्या घरासाठी साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेअंतर्गत सिडकोतर्फे साधारणतः 40.00 चौ.मी. ते 500.00 चौ.मी. क्षेत्राचे असे लहान आकाराचे भूखंड वितरित करण्यात आले आहेत. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेल्या तत्कालीन नियमावलीतील तरतुदीनुसार अशा भुखंडाना कमाल 1.50 चटई क्षेत्र निर्देशांकासह कमाल 13 मीटर उंचीच्या मर्यादेत विकास अनुज्ञेय होता.

तसेच इमारतीमध्ये पार्कींग ही स्टिल्टवर दर्शविली असल्यास इमारतीसाठी 13 मीटर उंचीला परवानगी आहे. आता ही स्टील्ट पार्किंगची उंची वगळून परवानगी असलेल्या चटई क्षेत्र निर्देशांकानुसार स्टिल्ट अधिक 4 मजल्यांचे बांधकाम करता येत होते. सध्या नवी मुंबईसाठी लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मध्ये स्टिल्टची उंची वगळण्याची तरतूद समाविष्ट नसल्याने आता 13 मीटर उंचीच्या मर्यादेत स्टिल्ट 3 मजले एवढेच बांधकाम करता येते.

परिणामी अशा भुखंडांवरील इमारतींच्या पुनर्विकासास खीळ बसली आहे. ही बाब लक्षात घेऊन साडेबारा टक्के योजनेअंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या भुखंडांवरील पुनर्विकास प्रस्तावांमध्ये, आता इमारतीच्या परवानगी असलेल्या उंचीमधून स्टिल्ट पार्किंगची उंची वगळण्याची तरतूद एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये तातडीने लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे अशा भुखंडांवरील रखडलेल्या पुनर्विकासाला चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.



## गीतासार



### अध्याय ६
### आत्मसंयमयोगः

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते। सर्वसङ्कल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ६-४ ॥

ज्यावेळी इंद्रियांच्या भोगांत आणि कर्मातही पुरुष आसक्त होत नाही, त्यावेळी सर्व संकल्पांचा त्याग करणाऱ्या पुरुषाला योगारूढ म्हटले जाते. ॥ ६-४ ॥

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् । आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ६-५ ॥

स्वतःच स्वतःचा संसारसमुद्रातून उद्धार करून घ्यावा आणि स्वतःला अधोगतीला जाऊ देऊ नये. कारण हा मनुष्य स्वतःच स्वतःचा मित्र आहे आणि स्वतःच स्वतःचा शत्रू आहे. ॥ ६-५ ॥

बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः । अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६-६ ॥

ज्या जीवात्म्याने मन व इंद्रियांसह शरीर जिंकले, त्या जीवात्म्याचा तर तो स्वतःच मित्र आहे आणि ज्याने मन व इंद्रियांसह शरीर जिंकले नाही, त्याचे तो स्वतःच शत्रूप्रमाणे शत्रुत्व करतो. ॥ ६-६ ॥

# नदी नाले जलाशये आटली...
# अरे माणसा पाणी जपून वापर



पाणी म्हणजे जीवन !
जल है तो कल है !

**शब्दांकन**
**दिलीप पवार**

एक वेळ पृथ्वीवर सजीव अन्ना शिवाय काही दिवस जिवंत राहू शकेल परंतु पाणी नसेल तर जिवंत राहणार नाही. ही संपूर्ण जीवसृष्टी पृथ्वीवर पाणी आहे म्हणूनच तर टिकुन आहे.ज्या दिवशी पाणी संपेल तेव्हा कदाचित जीवसृष्टीचा सुद्धा नाश झालेला असेल.

आज विज्ञानाच्या जोरावर माणसाने प्रत्येक क्षेत्रात भौतिक प्रगती केली आहे.परंतु हे करत असताना निसर्गाचा समतोल मात्र ठेवला नाही किंबहुना निसर्गाचे अतोनात नुकसान केले आहे. त्याचा परिणाम सध्या वाढलेल्या उष्णतेच्या रुपाने दिसत आहे.पारा 45 अंश सेल्सिअसच्या पुढे गेला बेसुमार वनांची कत्तल ,नैसर्गिक साधन संपत्तीची लुटमार चालू आहे आणि त्याचा परिणाम पर्यावरणातील घटकावर होत आहे. परिणामी आज पर्जन्याचे प्रमाण खुपच कमी झाले असून त्यातही अनियमितता दिसत आहे. कुठे महापुर तर कुठे कोरडा दुष्काळ.

या सर्व गोष्टिंचा माणुस फक्त कानोसा घेतो आणि सोडून देतो. प्रत्यक्ष त्याचा अंगिकार मात्र करायला तयार नाही. आणि त्याचा मोठा दुष्परिणाम येणार्या काही काळात दिसून येईल.आज लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे या वाढत्या लोकसंख्येला भविष्यातील पाण्याचे नियोजन करने गरजेचे आहे. आजची आपल्य देशातील पाण्याची परिस्थिती बघितली तर कुठलाच असा प्रांत किंवा प्रदेश मुबलक किंवा पाण्याने परिपूर्ण आहे असा नाही. महाराष्ट्रात तर फार भयंकर परिस्थिती आहे. फेब्रुवारी ,मार्च महिना उजाडताच ग्रामीण भागातील नदी, नाले ,विहिरी जलाशये तळ गाठायला लागली आहेत. पाण्यासाठी महिला हंडे ,कलशी घेऊन रानोमाळी हिंडताना दिसून येत आहे. पाणी टंचाईच्या झळा बसत आहे.

पाणी टंचाईवर मात करण्यासाठी शासनाकडून आजपर्यंत अनेक योजना आणल्या आणि गेल्या पण गाव-पाडे ,वाडी वस्ती तहानलेलीच राहिली.धरण उशाला झाले पण स्थानिकांच्या घशाची कोरड मात्र गेली नाही. याला कारण सरकारने पाण्याचे योग्य पद्धतीने न केलेले नियोजन ही कारणीभूत आहे. अशाच प्रकारे पाण्याचे दुर्भिक्ष दरवर्षी येत राहिले तर येणारा भविष्यकाळ फार कठीण असणार आहे.



म्हणून या देशाचा एक सुजाण व जबाबदार नागरिक म्हणून आपण पाणी वाचविण्याची सुरुवात स्वतः पासून करू या. पाणी वाचवु या , पाण्याची बचत करूया तरच ही जीवसृष्टी वाचेल हे सांगण्याची कोणा ज्योतीषाची गरज नाही हे मात्र खरे....

## विजेच्या विविध समस्या सोडविण्यासाठी निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद :** शहापूर नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमाक 3 मधील व आजुबाजूच्या परिसरात असलेल्या विजेच्या विविध समस्या सोडवाव्यात अशी मागणी भाजप शहापूर उपशहराध्यक्ष मनोज पानसरे यांनी वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता, शहापूर यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

शहापूर नगरपंचायत हद्दीतील संत ज्ञानेश्वर नगर, समर्थ नगर, गोडाऊन व एस.बी. कॉलेज या प्रभागात व परिसरातील रहिवासी गेल्या अनेक वर्षांपासून वीज वितरणच्या अनेक समस्यांना सामोरे जात



आहेत. येथे झपाट्याने नागरीकरण वाढत आहे. धोकादायक वीज वाहिन्या, पोल बदलण्याकडे दुर्लक्ष होऊन काही विकासकांना स्वतंत्र रोहित्र ( ट्रान्सफॉर्मर ) न देता वीज ग्राहकांच्या रोहित्रावरून इमारत सदनिकांना वीज पुरवठा दिल्याने कमी वीज पुरवठा होणे आदी विज संदर्भातील समस्या निर्माण होत आहेत.

दरम्यान, येथील जीर्ण झालेल्या वीज वाहिन्या, पोल व डिओ बदलून नवीन उच्च दाबाच्या रोहित्रची उभारणी करावी, पळसपाडा येथे नवीन लघु वाहिनी बसविण्यात येऊन इतर वीज समस्या सोडवून विकासकांना त्यांच्या प्रकल्पानुसार स्वतंत्र रोहित्र बसविण्याचे आदेश करावेत अशी मागणी मनोज पानसरे यांनी केली असून या समस्या न सोडविल्या गेल्यास भाजप शहर उपशहराध्यक्ष मनोज पानसरे यांच्या नेतृत्वाखाली वीज ग्राहक आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत असे म्हटले आहे.

## दुध भेसळ खोरांवर मकोका ?
## कारवाईसाठी कायद्यात सुधारणा करणार
### - उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** दूध आणि तत्सम अन्नपदार्थात होणारी भेसळ ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे लोकांच्या जीवाला धोका निर्माण होतो. हे खपवून घेतले जाणार नाही. दूध आणि तत्सम अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कडक कारवाई करण्यासाठी सध्याच्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. त्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

**दुधातील भेसळ तपासण्यासाठी प्रत्येक विभागात प्रयोगशाळा सुरू करण्याचे निर्देश**

**अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्रीसाठी वाढीव निधी देण्याची तयारी**

ॲनालॉग चीज हा पदार्थ राज्यात अनेक ठिकाणी ॲनालॉग पनीर या नावाने विक्री होत असल्याबाबत तसेच सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील भोसे येथे उघडकीस आलेल्या दूध भेसळीसंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचनेवर झालेल्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार विक्रम पाचपुते, आमदार अभिजीत पाटील, आमदार कैलास पाटील यांच्यासह अन्न व औषध प्रशासन, वैद्यकीय शिक्षण, गृह तसेच वित्त व नियोजन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.तर सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक (ग्रामीण) हे दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

दुधातील भेसळ तपासण्यासाठी तातडीने प्रत्येक विभागात एक प्रयोगशाळा सुरू करावी, पनीर मध्ये ॲनालॉग चीज असल्यास त्यासंबंधीची माहिती दुकानात दर्शनी भागात लावण्यासंदर्भात सूचना द्याव्यात. दूध भेसळीसंदर्भात जनजागृती करण्यात यावी, भेसळीसंदर्भात जनतेला तक्रारी नोंदविण्यासाठी टोल फ्री क्रमांक योग्य प्रकारे कार्यान्वित करावा,पोर्टल विकसित करावे असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

दुधातील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाला अत्याधुनिक तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये आणखी निधी देण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी दिली. अन्न व औषध प्रशासन विभागातील अपुऱ्या मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी डेअरी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांची सेवा घेण्यात यावी, त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

सोलापूर दूधभेसळ प्रकरणातील आरोपी कोणीही, कितीही मोठे असतील तरी त्यांना लवकरात लवकर अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) यांना दिल्या.

## शहर अभियंत्या अनिता परदेशी यांच्या कार्यकाळाची वर्षपूर्ती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सिटी इंजिनियर श्रीमती अनिता परदेशी यांच्या कार्यकाळाला आज एक वर्ष पूर्ण होत आहे या निमित्ताने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी आज परदेशी त्यांना पुष्पगुच्छ देवून पेढा भरविला आणि त्यांना त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या




श्रीमती अनिता परदेशी यांनी वर्षभरात आपल्या कामाचा ठसा उमटवून सर्व अधिकाऱ्यांची मन जिंकली. आणि महापालिकेच्या कामाला गती दिली.

## रेसिपी
### मशरूम मटार मसाला



**साहित्य-**

टोमॅटो - चार ,कांदे - दोन,मीठ चवीनुसार,हळद - दोन चमचे,धणे पूड - एक टीस्पून,गरम मसाला - अर्धा चमचा,तिखट- एक टीस्पून,मशरूम - २०० ग्रॅम,हिरवे मटार - एक वाटी,लसूण ,आले ,तेल,हिरव्या मिरच्या

**कृती-**

सर्वात आधी एका पॅनमध्ये दोन कप पाणी घाला आणि पाणी गरम झाल्यावर त्यात मटार उकळा. नंतर पाणी पुन्हा गरम करा आणि त्यात मीठ आणि हळद घाला. तुम्हाला मशरूमचे चार भाग करावे आणि ते या पाण्यात टाकावे लागतील. आता त्यात मशरूम ब्लँच करा. ब्लँचिंग केल्यानंतर, ते पाण्यातून बाहेर काढा आणि बाजूला ठेवा.

आता एका पॅनमध्ये तेल गरम करा आणि त्यात दोन मध्यम आकाराचे कांदे, चार मध्यम आकाराचे टोमॅटो, एक इंच आले, दोन हिरव्या मिरच्या आणि १० ते १२ लसूण पाकळ्या पाच मिनिटे परतून घ्या. टोमॅटो लवकर वितळण्यासाठी त्यात थोडे मीठ घाला. सर्व मऊ झाल्यानंतर तसेच आता थंड होऊ द्या. मिश्रण थंड झाल्यावर ते मिक्सरमध्ये बारीक करा. आता एक पॅन गरम करा आणि त्यात तेल गरम करा. त्यात जिरे घाला. आता त्यात वाटलेली टोमॅटो-कांद्याची प्युरी घाला. तसेच हळद, धणे पूड, तिखट आणि चवीनुसार मीठ घाला.ही पेस्ट तेल सुटेपर्यंत शिजवावी लागेल.पॅनमध्ये तेल दिसायला लागेल तेव्हा थोडे थोडे पाणी घाला आणि ढवळत राहा. तसेच त्यात मशरूम आणि मटार घाला आणि शिजू द्या. आता वर गरम मसाला आणि बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. तर चला तयार आहे आपली मशरूम मटार मसाला रेसिपी, गरम नक्कीच सर्व्ह करा.

## संविधानामुळे जागतिक स्तरावर आपली लोकशाही सशक्त आणि स्थिर
### - विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** सन १९५० पासून सुरू झालेल्या भारतीय संसदीय परंपरेने आज ७५ वर्षांची महत्त्वपूर्ण वाटचाल पूर्ण केली आहे. भारतीय संविधानाच्या भक्कम अधिष्ठानामुळे देशाने जागतिक स्तरावर आपली लोकशाही सशक्त आणि स्थिर ठेवली आहे, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी सभागृहात केले.

भारतीय गणराज्याच्या ७५व्या वर्षानिमित्त "भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल" या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. या चर्चेत सभापती प्रा. शिंदे यांनी संविधानाची महती आणि त्याचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी संविधानाद्वारे भारताने साधलेल्या ऐतिहासिक प्रगतीचा आढावा घेत राज्यघटनेच्या मूल्यांवर भर दिला.

भारतरत्न डॉ.आंबेडकर यांच्या दूरदर्शी विचारांमुळे आज भारत जगातील एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून ओळखले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

भारतीय राज्यघटनेने दिलेली स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मुल्यांची महती अधोरेखित करत प्रा. शिंदे म्हणाले, ही मूल्ये आपल्या देशाच्या लोकशाहीचा दीपस्तंभ आहेत. या तत्वांवर आधारित आपली राज्यघटना येणाऱ्या पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणारी आहे.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२६ ते १९३७ या काळात मुंबई विधान परिषदेचे सदस्य म्हणून आपले मार्गदर्शक विचार दिले, ज्यांनी आजच्या भारतीय संविधानाचा पाया घातला. ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

भारतीय लोकशाहीचा गौरवशाली इतिहास अधोरेखित करताना स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय तसेच सार्वभौमत्व, लोकशाही, गणराज्य, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता ही राज्यघटनेने दिलेली मूल्ये आणि उद्दिष्ट्य आपल्या दृष्टीने चिरंतन प्रेरणाचे स्त्रोत बनलेले आहेत. भारताने संविधानाच्या आधारे ७५ वर्षे लोकशाही टिकवून ठेवत प्रगत राष्ट्र म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे, असेही प्रा. शिंदे यांनी नमूद केले.

संविधानाची अमृतमहोत्सवी वाटचाल संपूर्ण देशभरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरी केली जात आहे. आपले संविधान प्रत्येक पिढीला प्रेरणा आणि दिशा देईल, यासाठी आपण सर्वांनी कटिबद्ध राहायला हवे," असे आवाहन सभापती प्रा.शिंदे यांनी केले. विधानपरिषदेत झालेल्या या पहिल्या दिवशीच्या चर्चेत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सदस्य ॲड.अनिल परब, प्रसाद लाड, भाई जगताप, अमित गोरखे, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, सत्यजीत तांबे, जगन्नाथ अभ्यंकर, सदाभाऊ खोत, अरुण लाड, संजय केनेकर, सुनील शिंदे, योगेश टिळेकर, सचिन अहिर, ज्ञानेश्वर म्हात्रे या सदस्यांनी सहभाग घेतला.

## मणिकर्णिका अवॉर्ड २०२५...

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** जॉ्यंट्स ग्रुप ऑफ कल्याण मिडटाउन आयोजित जॉइंट्स मणिकर्णिका अवॉर्ड 2025, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सन्माननीय महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती सौ. वीणाताई गणेश जाधव यांना जॉ्यंट्स ग्रुप ऑफ कल्याण यांस कडून सन्मानपूर्वक श्री.मनोहरजी पालनसर, श्री. नरेशचंद्र सर (संचालक बिर्ला कॉलेज) श्री. प्रशांतजी भागवत साहेब (कार्यकारी अभियंता कल्याण डोंबिवली महानगरपालिका) डॉक्टर श्री. किशोर देसाई, श्री. संजय गुप्ता(रस्तोगी ) प्रेसिडेंट जायंट्स ग्रुप




मिडटाउन व सौं. उर्वशी गुप्ता (रस्तोगी) प्रेसिडेंट जॉयंट सहेली मिडटाउन यांच्या शुभहस्ते देण्यात आला, सभापती व नगरसेविका असताना आपल्या कार्यकाळात उल्लेखनीय कार्य --- त्यातील प्रमुख कामे राणी लक्ष्मीबाई उद्यानाचे सुशोभीकरण करणे, अत्याधुनिक व सुसज्ज असे आकांक्षी शौचालय, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र व बहुउद्देशीय केंद्र त्यात कॅरम, बुद्धिबळ, संगणक, वाचनालय विविध लेखकांची व कवींची पुस्तके, ओपन जिम, अपंगाना पेन्शन, रामबाग मधील बहुतांश रस्ते कॉंक्रिटीकरण करणे, मेन लेन सह,लेन नंबर चार, लेन नंबर पाच, लेन नंबर सहा व कर्णिक रोडचा काही भाग, मुरबाड रोड संतोषी माता रोड यासारखे असून, रामबाग मधील जेष्ठ नागरिकांसाठी सुसज्ज असे रामबाग जेष्ठ नागरिक केंद्र त्यातच मुलांसाठी वातानुकूलित अभ्यासिका ज्येष्ठांसाठी वाचनालय तसेच प्रभागातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य सेवा देणारा आपला दवाखाना यासारखे भरीव कार्य त्यांनी केले आहे, त्यांच्या या संपूर्ण कार्याचा उल्लेख करून त्यांना यावर्षीचा जॉयंट्स मणिकर्णिका 2025 पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## पेण येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** आगामी सण, उत्सवाच्या अंनुषगांने पेण पोलीस ठाणे येथे शांतता कमिटीची बैठक पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या अध्यक्षतेखाली पेण पोलीस ठाणे येथे शांतता कमिटीची मिटिंग संपन्न झाली.

यावेळी गुढीपढवा, रमजान ईद, आदि महत्वाच्या विषयांवर चर्चा झाली, कायदा व सुव्यवस्था राखून सर्वांनी आनंदाने सण साजरे करावेत, तसेच सर्व,धर्म बांधव यांनी एकरूप होऊन सण साजरे करावेत असे आवाहन पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी केली यावेळी शांतता कमिटीचे सदस्य दिनेश म्हात्रे ,सुनील पाटील, अविनाश म्हात्रे, एल के म्हात्रे, देवा पेरवी, संतोष पाटील, भाई पोटे, कान्हैय्या पुनमिया ,अनिल दरेकर,पायल सुर्वे, गिरीश शहा, मोईज बोहरी, शिगवण, भरत साळवी, दिपक संसारे ,अनंत पडवळ, गोपनीय किशोर घरत,निलेश ठाकुर आदी सदस्य उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# जिल्हा परिषदेत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गुणगौरव सोहळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत सेवेत कार्यरत असणाऱ्या वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील जिल्हा परिषद ठाणे व पंचायत समिती येथील आदर्श कर्मचारी यांना आज, दि. २६ मार्च, २०२५ रोजी बी. जे. हायस्कूल येथील सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे मार्गदर्शन करताना म्हणाले की,"एखादी संस्था कार्य करत असते तेव्हा त्या संस्थेअंतर्गत सर्व कर्मचाऱ्यांचा त्या कामकाजामध्ये सहभाग असतो. सर्वांनी एकत्रित काम केल्याने जिल्हा परिषद संस्थेचा सर्वांगीण विकास होत आहे, त्यामुळे तुमचे काम मोलाचे आहे. जिल्हा परिषदेकडून सन्मानित केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करतो. अधिक कार्यतत्परतेने यापुढे देखील तुम्ही काम करत राहा, अशी अपेक्षा करतो."

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी जिल्हा परिषदेचे नाव लौकिक करण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांचा वाटा मोलाचा असतो. तुम्ही केलेल्या कामामुळे जिल्हा परिषद नेहमी पुढे असते. या पुढे देखील जिल्हा परिषदेत उत्कृष्ट कामकाज करण्याबाबत उपस्थितांना शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक करताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) अविनाश फडतरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना वेगवेगळया योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी अधिकारी व कर्मचारी काम करत असतात त्यांच्या कामाचे कौतुक करण्यासाठी आपण जिल्हा व तालुकास्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे ही मोलाची बाब आहे, असे प्रतिपादन केले.

यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल, कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर, जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी व सत्कार मुर्ती व त्यांचे कुटुंबीय आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद स्तरावरील लघुलेखक उच्च श्रेणी (सामान्य प्रशासन विभाग) संजय सूर्यकांत कवडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी (आरोग्य विभाग) योगिता लक्ष्मण फाठक, विस्तार अधिकारी सांख्यिकी (आरोग्य विभाग) सुनिल वसंत कांबळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी (कृषी विभाग) मेघना बबन गोमासे, वरिष्ठ सहाय्यक (सामान्य प्रशासन विभाग) नरेंद्र बाळकृष्ण कुबल, कनिष्ठ सहाय्यक (आरोग्य विभाग) योगेश प्रकाश घाग, कनिष्ठ सहाय्यक (ग्रामपंचायत विभाग) श्रीकांत चौधरी, वाहनचालक (आरोग्य विभाग) रमेश मुकुंद विदे, हवालदार (लघुपाटबंधारे विभाग) लता यशवंत दळवी, परिचर (आरोग्य विभाग) महेंद्र भास्कर पाटील, तसेच पंचायत समिती स्तरावरील विस्तार अधिकारी सांख्यिकी (पंचायत समिती अंबरनाथ) प्रदीप दत्तू मोहेकर, वरिष्ठ सहाय्यक (पंचायत समिती शहापूर) रमेश हरी लोभी, कनिष्ठ सहाय्यक (पंचायत समिती शहापूर) मेघराज विठ्ठल निमसे, कनिष्ठ सहाय्यक (पंचायत समिती कल्याण) सायरा संजय ऐगडे, वाहनचालक (पंचायत समिती मुरबाड) समिप हरदास, परिचर (पंचायत समिती शहापूर) दीपक विठ्ठल वेखंडे, परिचर (पंचायत समिती कल्याण) सुहासिनी कांगणे यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

जिल्हा परिषदेकडून आज सन्मानित होताना अनेक जबाबदाऱ्या नव्याने वाढल्याने मी सर्वांच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचे आभार मानते, असे मत कनिष्ठ प्रशासन अधिकारी (कृषी विभाग) मेघना बबन गोमासे यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषदेमार्फत आज मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते गौरव स्वीकारताना आनंद झाला. हा गौरव म्हणजे केलेल्या कामाला मिळालेली शाबासकी आहे. - हवालदार (लघुपाटबंधारे विभाग) लता यशवंत दळवी

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विद्या शिर्के यांनी उत्तम प्रकारे करून कार्यक्रमाची धुरा सांभाळली. सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी या कार्यक्रमाचे नियोजन उत्कृष्ट पद्धतीने केले.

## भिवंडी पालिका आयुक्तांच्या लातुर जिल्हा परिषदेच्या कामाचा शासनाने केला गौरव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त यांनी लातूर जिल्हा परिषद येथे मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत असताना खेलो लातूर हा नाविन्यपुर्ण उपक्रम राबविला होता. या उपक्रमांतर्गत मनरेगा मधून शाळांमध्ये क्रिडांगणाची निर्मिती करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाने सामान्य प्रशासन विभागाच्या दि. 26.03.2025 च्या शासन निर्णयान्वये राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा 2024-25 करिता राज्यस्तरीय पारितोषीक विजेते जाहीर केले असून, लातुर जिल्हा परिषदेच्या खेलो लातूर या उपक्रमास सर्वोत्कृष्ट कल्पना/ उपक्रम या शिर्षकाखाली तृतीय क्रमांकाने गौरविण्यात आले आहे. लातूर जिल्हा परिषदेच्या धर्तीवर भिवंडी शहरातदेखील नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्याचा मानस महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री. अनमोल सागर यांनी व्यक्त केला आहे.

## विक्रमगड पोलिसांची कामगिरी

# बिहारहुन पळून आलेल्या मुलींचा अर्धा तासात शोध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



विक्रमगड : बिहारहुन आपल्या राहात्या घरातुन आई वडील आपल्या तिन अल्पवयीन मुलींना सारखी सारखी काम करीत नाही तुमचा काही उपयोग नाही घरातुन निघुन जा रागाचे भरात बोलत असल्याने या तिन्ही मुली आई वडीलांच्या अशा बोलण्याला कंटाळुन 20 मार्च रोजी आपल्या राहत्या बिहारच्या घरुन निघुन आल्या होता या तिन्ही अल्पवयीन मुलींचा शोध चालु असल्याची खबर विक्रमगड पोलिसांना मिळताच विक्रमगड पोलिस कार्यालयाचे पोलिस निरिक्षक रविंद्र पारखे,उपनिरिक्षक दिपक धुस, पोलिस naaik सुशिल बांगर, पोलिस नाईक संदीप पाटील यांची एक टिम तयार करुन मुलींचा शोध घेत अवघ्या अर्धा तासात या मुलींचा शोध लावला.व सदर बातमीची माहिती बिहार पोलिसांना दिली आहे.सध्या हया मुली बिहार पोलिसांच्या ताब्यांत देण्यात आल्याचेही कार्यालयाकडुन सांगण्यात आले अशा प्रकारे विक्रमगड पोलिसांनी कर्तव्य बजावत उत्तम कामगिरी केल्याबददल विक्रमगड वासियांकडुन त्यांचे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

या मुलींच्या आई वडील यांनी त्यांच्या तिन मुली 20 मार्च राजी बिहार येथील राहात्या घरातुन निघुन गेल्याची तक्रार बिहार पोलिसांना अर्जाद्वारे केली होती त्यानंतर बिहार पोलिसांनी तपास सुरु केला असता त्यांना हाती काही लागत नसल्याने याबाबतची खबर इतर पोलिस कार्यालयात दिली होती त्यानुसार विक्रमगड पोलिसांना याबाबतची माहिती होताच अवघ्या अर्धा ते पाउन तासांमध्ये या मुलींचा शोध लावण्यात विक्रमगड पोलिस टिमला यश आले.

## कल्याणात रक्तदान शिबीर आणि सुशिक्षित बेरोजगार नोंदणी अभियान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण - छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनी येथील आपलं प्रतिष्ठान ह्या संघटनेने २९ मार्च रोजी रक्तदान शिबिर आयोजित करून छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहण्याचे आवाहन केले आहे .

संपूर्ण महाराष्ट्राचे प्रेरणास्थान असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्यासाठी अतोनात छळ सहन करून २९ मार्च रोजी बलिदान दिले . याबद्दल आदर, प्रेम व कृतज्ञता म्हणून आपलं प्रतिष्ठान ह्या संघटनेने शनिवार २९ मार्च रोजी सकाळी १० ते ४ वाजे पर्यंत कल्याण पश्चिम येथील महापालिका मुख्यालयाजवळील शंकरराव चौकातील स्वामी नारायण हॉल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे . ह्या शिबिरात जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करून छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहण्याचे आवाहन करण्यात आले आहे . तसेच रक्तदान शिबिरात सुशिक्षित बेरोजगारांसाठी नाव नोंदणी अभियान राबविण्यात येणार असून बेरोजगारांना नोकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे . अधिक माहितीसाठी आपलं प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल काकडे 9324552963 /8104211818 ह्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे

# मुरबाड तालुक्यातील लाकडी घरे संपुष्टात येणार ?

## सिमेंट लोखंड यांचा मोठया प्रमाणात वापर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



आजही जुने लाकडी वाडे सुरक्षित

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील लाकडांनी बांधलेली घरी ,जुने वाडे सुप्रसिद्ध असून त्यातील कलाकुसर पाहण्यासाठी आजही लोक तेथे जातात. बांगर पाड्यातील ५२दरवाजे असणारा बांगरवाडा ,धसई येथील घोलप वाडा , नेवाळपाडा येथील झुंजारराव वाडा असे वाडे प्रसिद्ध आहेत. त्यामुळे आजही तालुक्यातील जुने वाडे सुरक्षित असल्याचे पहायला मिळत आहे.

मुरबाड तालुक्यात घनदाट जंगल असल्याने सांग, शिसव,आंबा, जांभूळ,मोह ही झाडे उंच व खूप मोठ्या प्रमाणात होती. या लाकडांपासुन घरे,वाडे बांधले जात असत. लाकडी घरे आरोग्यदायी व उन्हाळयात थंडावा देणारी होती.त्यातून आरोग्य चांगले राहण्यासाठी मदत होत असे पूर्वी लाकूड काम करणारे सुतारही गावोगावी मिळत असत. ही घरे बांधण्यासाठी अनेक दिवस खर्च होत असे परंतु आज या पारंपारिक सुतारांची संख्या नगण्य असून परप्रांतीयांनी या व्यवसायात जम बसवण्यास सुरुवात केली आहे .सध्या जंगलतोड झाल्याने लाकडांना पर्याय म्हणून लोखंड, सिमेंट,वाळू, सिमेंट पत्रे यांच्या वापर सर्वत्र ग्रामीण भागात वाढला आहे त्याचा परिणाम म्हणून तापमानात वाढ होत असून उष्णता वाढत आहे. गावागावातील कुडाची ,मातीची , लाकडाची घरे नाहीशी होऊन त्या जागी सिमेंटची टुमदार घरे उभी राहत आहेत.लाकडाच्या घरात जो नैसर्गिक आनंद व आरोग्यदायी फायदे मिळत होते त्याला आधुनिक पिढी पारखी होणार आहे .भविष्यात लाकडाची घरे इतिहास जमा होतील व सिमेंटचीच जंगले खेड्यापाड्यात उभी राहतील अशी भिती व्यक्त केली जात आहे .

> **मुरबाड तालुक्यातील ऐतिहासिक बांगरवाडा ही वास्तू २५०-३००वर्ष जुनी आहे. दानशूर कै.कान्हू गोविंद बांगर यांनी ती बांधली. सध्या पूर्वजांचा अमूल्य ठेवा म्हणून आम्ही सर्व बांगर कुटुंबियांनी एकत्र येऊन तन मन धनाने तो जतन केला आहे संपूर्ण सागवानी लाकडांनी तो बांधला असून अवाढव्य आकाराची लाकडे कशी वापरली असतील हा प्रश्न आज पडतो. तरीही योग्य पध्दतीने डागडुजी करत संपूर्ण बांगर कुटुंब वास्तू संवर्धन करत आहेत**
>
> **- डॉ.योगेश गजानन बांगर व कुटुंबिय बांगरपाडा/मुरबाड**

# बांधकाम कामगारांसाठी निवृत्ती वेतन योजना

## - कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या आणि वयाची 60 वर्षे पूर्ण केलेल्या बांधकाम कामगारांना दरवर्षी ₹ 12,000 इतके निवृत्तीवेतन देण्यात येणार असल्याची माहिती कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी विधानपरिषदेत निवेदनाद्वारे दिली.

कामगार मंत्री ॲड.फुंडकर म्हणाले की, सन 1996 मध्ये केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या हितासाठी कायदा लागू केला. त्यानुसार, महाराष्ट्र राज्याने 2007 मध्ये नियम आखले आणि 2011 मध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाकडे 18 ते 60 वर्षे वयोगटातील बांधकाम कामगार नोंदणी करू शकतात व विविध योजनांचा लाभ घेऊ शकतात. मात्र, 60 वर्षांनंतर त्यांची नोंदणी होऊ शकत नाही व कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नाही.

ही बाब लक्षात घेऊन सरकारने निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला असून या योजनेच्या अनुषंगाने, नोंदणी कालावधीवर आधारित लाभ निश्चित करण्यात आला असल्याचे मंत्री ॲड.फुंडकर यांनी सांगितले. यात 10 वर्षे नोंदणी पूर्ण झालेल्या कामगारांना वार्षिक ₹ 6,000 (50%); 15 वर्षे नोंदणी पूर्ण झालेल्या कामगारांना वार्षिक ₹ 9,000 (75%) आणि 20 वर्षे किंवा अधिक नोंदणी पूर्ण झालेल्या कामगारांना वार्षिक ₹ 12,000 (100%) असे लाभ देण्यात येईल.

या निर्णयामुळे सध्या मंडळाकडे नोंदणीकृत 58 लाख बांधकाम कामगार आणि त्यांचे कुटुंबीय तसेच भविष्यात नोंदणी होणारे बांधकाम कामगार लाभार्थी ठरणार आहेत.

कामगार मंत्री ॲड. फुंडकर यांनी सांगितले की, "या योजनामुळे लाखो बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांचे भविष्य सुरक्षित होणार आहे. कायद्याच्या तरतुदी व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन लवकरच या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सविस्तर कार्यपद्धती निश्चित करण्यात येणार असल्याचे त्यांनी निवेदनाद्वारे सांगितले.

# कीर्तनाची परंपरा हा अमूल्य ठेवा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : कीर्तनाची परंपरा फार जुनी आहे. या परंपरेशी सर्व प्रकारचे लोक जोडले गेले. ही परंपरा छत्रपती शिवाजी महाराज यांनी जपली. देव, देश आणि धर्माकरिता त्यांना आव्हान करून स्वराज्याची स्थापना केली. या स्वराज्याच्या स्थापनेमध्ये या संत शक्तीचा, कीर्तन शक्तीचा, प्रबोधनाचा प्रचंड मोठा वाटा आहे. म्हणूनच ही परंपरा अमूल्य ठेवा आहे, की जो पुढच्या पिढ्यांपर्यंत नेण्याचे काम करणे गरजेच आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

रवींद्र नाट्यमंदिर येथे सोनी मराठी आणि पु.ना.गाडगीळ ॲन्ड सन्स, चितळे बंधू यांच्या संयुक्तविद्यमाने आयोजित 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' कार्यक्रमला शुभेच्छा देण्यासाठी आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी संत तुकाराम महाराज यांचे वंशज प्रा.सदानंद मोरे, 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार या कार्यक्रमाचे परीक्षक ह.भ. प. राधाताई सानप, ह.भ.प. जगन्नाथ पाटील महाराज, सोनी एंटरटेनमेंटचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव बॅनर्जी पु.ना.गाडगीळ ॲन्ड सन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित मोडक आदी मान्यवर उपस्थित.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार या संकल्पनेवर कार्यक्रम तयार केला याबद्दल सोनी मराठीचं मनापासून अभिनंदन. माध्यमं बदलत आहेत. आणि ज्याला आपण कम्युनिकेशन म्हणतो, त्याच्यामध्ये सोनीसारखे प्लॅटफॉर्मची खूप महत्त्वाची भूमिका आहे.

कीर्तन ही अतिशय जुनी परंपरा आहे आणि कीर्तनकारांनी कीर्तनातून, निरूपणातून, अभंगातून, गायनातून, जे विचार समाजामध्ये पोहोचवले, जे समाज प्रबोधन केलं, ते खऱ्या अर्थानं अतिशय अवर्णनीय अशा प्रकारचं आहे. कीर्तनातून लोकप्रबोधन केलं जाते. सामान्य माणसाला भक्ती परंपरेशी जोडून, कोणत्याही परिस्थितीमध्ये तो निराश होणार नाही, त्याच्यामध्ये जगण्याची आणि लढण्याची वृत्ती राहील अशा प्रकारचा प्रयत्न कीर्तनामधून केला जातो. या परंपरेचं सगळयात मोठं महात्म्य म्हणजे कीर्तनकारांकडे जगाचं ज्ञान आहे, वैश्विक विचार आहे, पण तो वैश्विक विचार सांगत असताना तो साध्या भाषेमध्ये सांगितला जातो की सामान्यातल्या सामान्य माणसाला तो वैश्विक विचार समजतो, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. यावेळी संत नामदेव महाराजांचे १६वे वंशज ह.भ.प. माधव महाराज नामदास, सावता महाराजांचे १७वे वंशज ह.भ.प. रवीकांत महाराज वसईकर, शेख महंमद महाराजांचे दहावे वंशज ह.भ.प. जब्बार महाराज शेख, संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. बापूसाहेब महाराज देहूकर, संताजी महाराज जगनाडे यांचे १४वे वंशज ह.भ.प. जनार्दन महाराज जगनाडे, संत बहिणाबाईंचे १३वे वंशज ह.भ.प. प्रमोद पाठक, संत नरहरी महाराज यांचे २१वे वंशज शंकर महामुनी, संत एकनाथ महाराजांचे १४वे वंशज ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी 'कोण होणार महाराष्ट्राचा लाडका कीर्तनकार' या कार्यक्रमात विजयी ठरणाऱ्या कीर्तनकारास देण्यात येणाऱ्या चांदीची सुंदर, सुबक वीणाचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. सदानंद मोरे यांनी मनोगत व्यक्त केले.




## स्व.पल्लवी सरोदे यांच्या स्मरणार्थ जिल्हा माहिती कार्यालयातर्फे कमळ व वॉटर लिली रोपांची लागवड

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे :शासनाच्या "मिशन-100 डेज्" अंतर्गत शासकीय कार्यालयांसाठी 7 कलमी कृती आराखडा लागू केला असून त्याअंतर्गत विविध लोकोपयोगी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. याचाच एक भाग म्हणून ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाच्या आवारात "टेरेस गार्डन" ही संकल्पना राबविण्याचे नियोजन आहे.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या स्वीय सहाय्यक स्व.पल्लवी सरोदे यांचे दि.23 मार्च 2025 रोजी अपघाती निधन झाले. "टेरेस गार्डन" उपक्रमाची सुरुवात म्हणून ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाने आज आपल्या कार्यालयाच्या आवारात स्व.पल्लवी सरोदे यांच्या स्मरणार्थ कमळ व वॉटर लिली या रोपांची लागवड केली आहे. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप, वृक्षतज्ञ विजयकुमार कट्टी, समाजसेवक मोहन शिरकर आणि जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

"टेरेस गार्डन" ही संकल्पना ठाणे शहरातील वृक्षतज्ञ श्री.विजयकुमार कट्टी यांच्या मार्गदर्शनातून साकारण्यात येत आहे. श्री. विजयकुमार कट्टी हे नागरिकांना डासविरहित परिसर ठेवण्याकरिता तसेच मानवी जीवनाकरिता इतर उपयुक्त झाडांची लागवड करण्याकरिता विनामूल्य मार्गदर्शन करतात. "टाकाऊ झाडांपासून टिकाऊ झाडांची निर्मिती व वृक्ष संवर्धन" हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

ठाणे जिल्हा प्रशासनातील कार्यालये, अधिकारी-कर्मचारी तसेच जिल्ह्यातील विविध हाऊसिंग सोसायट्या, सामाजिक संस्था, सामान्य नागरिकांना जर आपल्या परिसरात रोपांची लागवड करावयाची असल्यास वृक्षतज्ञ विजयकुमार कट्टी (7977513822) यांच्याशी संपर्क साधावा व पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता आपले अनमोल योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी केले आहे.

## डेटा सेंटर, स्टार्टअप व इनोव्हेशन क्षेत्रात महाराष्ट्र देशात अव्वल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून डेटा सेंटर, स्टार्टअप, इनोव्हेशन व गुंतवणूकीमध्ये महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करत आहे. तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, फिनटेक या क्षेत्रातील गुंतवणूकदारांचे महाराष्ट्र हे आवडते गुंतवणुकीचे ठिकाण झाले आहे. नवी मुंबई परिसरात इनोव्हेशन सिटी उभारण्यात येत असून वसई, विरार, पालघर परिसरात चौथी मुंबई निर्माण होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुंबईतील हॉटेल ताजपॅलेस येथे आयोजित यु.एस. इंडिया बिझनेस कौन्सिल (यूएसआयबीसी) च्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी यूएसआयबीसीचे अध्यक्ष राजदूत अतुल केशप, यूएस कन्सुल जनरल माइक हंकी, यूएस चेंबरच्या अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुझेन क्लार्क आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, अमेरिका व भारतातील उद्योग वाढीमध्ये यु.एस. इंडिया बिझनेस कौन्सिल (यूएसआयबीसी)चे मोठे योगदान आहे. दोन्ही देशातील उद्योगांमधील सहकार्यासाठी अर्थपूर्ण व औपचारिक भूमिका कौन्सिल पार पाडत आहे. भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचे गुंतवणुकीचे स्थान आहे. भारतातील अनेक उद्योजक अमेरिकेत गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत, तसेच अमेरिकेतीलही अनेक गुंतवणूकदार भारतात येण्यास उत्सुक आहेत.

### संक्षिप्त

## स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानार्थ कृतज्ञता भिंतीचे भूमिपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यपाल सी पी राधाकृष्णन व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मंत्रालयाशेजारील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याशेजारी देशातील स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानार्थ कृतज्ञता भिंतीच्या निर्मितीसाठी भूमिपूजन करण्यात आले.

चक्र व्हिजन इंडिया फाउंडेशन ट्रस्टच्या पुढाकाराने या कृतज्ञता भिंतीची (Tribute Wall: The Wall of Honour for Freedom Fighters) निर्मिती केली जात आहे. भूमिपूजन सोहळ्याला विधानपरिषदेचे सभापती प्रा राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पुडुचेरी विधानसभेचे अध्यक्ष एम्बलम आर सेल्वम, राज्याचे माजी मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार श्रीकांत भारतीय, चक्र व्हिजन इंडिया फाउंडेशन ट्रस्टचे संस्थापक चक्र राजशेखर, उपाध्यक्ष गगन महोत्रा आदी उपस्थित होते.

## भारतीय सैन्य आणि महाराष्ट्र पोलीस जवानांचा जंगी सन्मान

### मयूर महाजन आणि रितेश चौंधरी यांचे जल्लोषात स्वागत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : देशसेवेचा गौरव आणि तरुणाईला प्रेरणा देणारा एक भव्य सोहळा उल्हासनगर कॅम्प नंबर ४ मधील श्रीरामनगर परिसरात रविवारी संध्याकाळी मोठ्या उत्साहात पार पडला. या भागातील मयूर महाजन यांची भारतीय सैन्य दलात आणि रितेश चौधरी यांची महाराष्ट्र पोलीस दलात नुकतीच भरती झाली असून, या दोन्ही तरुणांचा सन्मान करण्यासाठी एक भव्य स्वागतयात्रा आयोजित करण्यात आली होती.

२३ मार्च २०२५ रोजी संध्याकाळी ५:३० वाजता सिद्धेश्वर चौक (पूनम हॉटेलजवळ) येथून सुरू होऊन, श्रीरामनगरमधील गणपती मंदिर येथे या स्वागतयात्रेचा उत्साहात समारोप करण्यात आला. ढोल-ताशा, फटाके, पुष्पवृष्टी आणि देशभक्तिपर गीतांनी परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. श्रीरामनगरवासीयांनी मोठ्या संख्येने या यात्रेत सहभाग घेतला. परिसरातील नागरिकांनी घरातील लहान मुलांसह या कार्यक्रमाला हजेरी लावली. अनेकांनी "भारत माता की जय", "वंदे मातरम", "जय हिंद" अशा घोषणा देत संपूर्ण वातावरण देशभक्तीमय केले.

सन्मानार्थ मिरवणुकी दरम्यान स्थानिक नागरिकांनी दोघांचा पुष्पहारांनी सत्कार केला. मयूर महाजन आणि रितेश चौधरी यांचा मनःपूर्वक गौरव करताना त्यांच्या कुटुंबीयांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. या तरुणांच्या देशसेवेच्या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या स्वागतयात्रेचे आयोजन समस्त श्रीरामनगरमधील रहिवाशांच्या वतीने करण्यात आले होते. त्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा सोहळा एक संस्मरणीय आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.

उल्हासनगरमधील श्रीरामनगरचा इतिहास हा देशप्रेम आणि एकतेने भरलेला आहे. मयूर आणि रितेश यांची ही देशसेवेसाठी झालेली निवड हा त्या इतिहासातील नवा सोनेरी अध्याय ठरतो. त्यांच्या यशामुळे श्रीरामनगरचा प्रत्येक रहिवासी आज अभिमानाने मस्तक उंचावून चालतो आहे.
– योगेश म्हात्रे ( रहिवासी, श्रीरामनगर )

### मुरबाडमधील दुर्गम भागातील पशुपालकांसाठी

# फिरत्या पशुवैद्यकीय पथकाची संजीवनी





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : पशुपालन व डेअरी विभाग भारत सरकार व पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मुरबाड मध्ये फिरते पशु वैद्यकीय पथक सुरू करण्यात आले आहे. पशुपालकांनी शासनाच्या घरपोच पशुरुग्ण सेवेचा लाभ घ्यावा यासाठी केंद्र 1962 टोल फ्रि क्रमांक सुरु करण्यात आला आहे. मुरबाड तालुक्यामध्ये पशुस्वास्थ योजनेंतर्गत फिरत्या पशुचिकित्सा पथके पशुपालकांच्या शासकीय अल्प दरात पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने एक पथक कार्यान्वित केले आहे. त्यामुळे अनेक पशुपालकांना फिरते पशुवैद्यकीय पथक संजीवनी ठरत आहे. फिरते पशुधन चिकित्सक पथक मुरबाड तालुक्यामध्ये सुरु करण्यात आलेला असून पशुपालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुरबाड पशुधन विकास अधिकारी डॉ. स्वरूप चंदेल यांनी केले आहे. यानुषंगाने 1962 या टोल फ्रि क्रमांकावर गरजू पशुपालकांनी दुरध्वनी करुन त्यावर सेवा विनंती नोंदविल्यानंतर पशुसंवर्धन आयुक्तालयात स्थापित करण्यात आलेल्या मध्यवर्ती कॉल सेंटरद्वारे संबंधित विनंती नजीकच्या फिरत्या पशुचिकित्सालयाकडे अग्रेषित केली जाते व संबंधितद्वारे पशुरुग्णांवर उपचार करण्यात येतात. उपचारासाठी विहित कालमर्यादाही रोगलक्षणानूसार निश्चित करण्यात आले आहे.

मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागातील पशुरुग्णावर योग्य वेळी उपचार व्हावा यासाठी पशुवैद्यकीय पथकाचे एक वाहन कार्यान्वित करण्यात आले आहे. या फिरत्या पशु चिकित्सक पथकांमध्ये उपकरणांनी सुसज्ज वाहन, पशुवैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी आणि वाहनचालक तथा मदतनीस यांचा समावेश आहे.

दुर्गम भागातील सर्व शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी दारात सेवा मिळावी, जनावराचे लसीकरण करणे, कृत्रिम रेतन करणे, पशु विविध योजनांचा प्रसार करणे व सुसंवर्धन शिबिरे आयोजन करणे, पशुधन वाचवणे आदी या पशु फिरता दवाखान्याचे उद्दिष्ट आहेत. तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ.स्वरूप चंदेल, डॉ. अमोल सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.संपत देशमुख, पद्माकर पवार, वाहन चालक फर्डे, पशुधन पर्यवेक्षक छगन मेंगाळ आदींची टीम या मुरबाड च्या फिरत्या पशुधन चिकित्सा पथका मध्ये काम करत आहे.

मुरबाड तालुक्यामध्ये ही योजना एप्रिल 2024 पासून सुरु झाली असून आज पर्यंत 495 पाळीव गाय, बैल शेळी, म्हैस आदी जनावरांवर उपचार करण्यात आले आहे. फिरते पशुवैद्यकीय पथके कार्यरत असलेल्या तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना 1962 या टोल फ्रि क्रमांकाबाबत माहिती देवून पशुपालकांना या योजनेविषयी अवगत करावे. पशुपालकांसाठी घरपोच सेवा मिळण्यासाठी शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेस पशुपालकांनी प्रतिसाद द्यावा, आवाहन पशुसंवर्धन विभागाद्वारे करण्यात आले आहे.

प्रत्येक शेतकऱ्यांना, पशुपालकांच्या दारात वैद्यकीय सेवा देण्यासाठी केंद्र शासनाने राज्याला फिरते पशुवैद्यकीय पथक वाहने दिली आहेत.
पशुधन आरोग्य आणि पशु रोग नियंत्रण कार्यक्रमासाठी पशुपालकांना त्यांच्या प्राण्यांच्या आरोग्यासाठी १९६२ टोल फ्री नंबर वर फोन करावा शेतकऱ्यांच्या प्राण्यांची शासकीय अल्प दरात तपासणी, लसीकरण, औषधोपचार, पशुपालकांनी करून घ्यावे.
– डॉ.स्वरूप चंदेल ,पशुधन विकास अधिकारी (विस्तार)
पशुसंवर्धन विभाग पं.स.मुरबाड

माझी शेळी खूप आजारी पडली होती त्यावेळी मी १९६२ नंबर वर फोन केला आणि फिरते पथक तात्काळ उपलब्ध झाले आणि चांगल्या प्रकारचे मोफत उपचार मिळाले.' – वैंभव मेंगाळ, भोईरवाडी शेतकरी

केंद्र पुरस्कृत पशुस्वास्थ्य व पशुरोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत फिरत्या पशुचिकित्सा पथकांची स्थापना करण्यात आलेली आहे. या पथकामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना खूप फायदा होतो. आजपर्यंत ४९५ शेतकऱ्यांच्या पशुवर या फिरत्या पथकाने उपचार केले.'
– डॉ. संपत भोसले, फिरते पशुवैद्यकीय पथक

## हिंदू नववर्ष स्वागतयात्रे निमित्त स्वरांगिणी व दीपोत्सव दिमाखात साजरा





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गौरव परंपरेचा, उत्सव संस्कृतीचा या ब्रीदवाक्याला अनुसरून कल्याण संस्कृती मंच आणि इनरव्हील क्लब ऑफ कल्याण आयोजित हिंदू नववर्ष स्वागतयात्रा २०२५ अंतर्गत विविध कार्यक्रमांची रेलचेल कल्याणवासीयांना पहायला मिळत आहे. यापैकी रविवारी प्रबोधनकार ठाकरे सरोवर (काळा तलाव) येथे झालेला स्वरांगिणी हा महिला कलाकार विशेष सांगीतिक मैफिलीचा कार्यक्रम व त्यानंतर झालेला दीपोत्सवाचा कार्यक्रम फारच छान व देखणा झाला.केडीएमसी आयुक्त डॉ इंदूराणी जाखड, शहर अभियंता अनिता परदेशी, उपायुक्त संजय जाधव, माजी आमदार नरेंद्र पवार, बोरगावकर ग्रुपचे संजय बोरगावकर, सिमरन सुझुकीचे नंद असनानी, बिर्ला कॉलेजचे डॉ नरेश चंद्र, मच्छिंद्र जाधव, वरुण पाटील, वैभव भोईर आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. निसर्गाच्या सान्निध्यात बसून शास्त्रीय निमशास्त्रीय संगीताचा आस्वाद घेण्याची ही कल्पना अतिशय सुरेख आहे असे आयुक्त डॉ इंदू राणी जाखड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आवर्जून सांगितले व आयोजकांचे यासाठी विशेष कौतुक केले.सांगीतिक कार्यक्रमानंतर दिवेलागणीच्या वेळी श्रीरामाची पूजा व आरती करून दीपोत्सव साजरा केला. यात आयोजक, उपस्थित मान्यवर व नागरिकांनी मिळून दीप प्रज्वलित केले ज्यामुळे काळा तलाव परिसर सहस्त्र दिव्यांनी उजळून निघाला.

इनरव्हील क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा डॉ. अर्चना सोमाणी, सचिव ॲड. नीता कदम, प्रकल्प प्रमुख ॲड. अर्चना सबनीस, सहप्रमुख मीनाक्षी देवकर यांनी कल्याण संस्कृती मंचचे अध्यक्ष डॉ सुश्रुत वैद्य, सल्लागार ॲड निशिकांत बुधकर व इतर सर्व पदाधिकारी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, स्वागतयात्रा प्रायोजक, इनरव्हील क्लब ऑफ कल्याणच्या सर्व महिला सदस्या, रोटरी क्लब चे सदस्य, कल्याण गायन समाजाचे सदस्य तसेच कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद दिल्याबद्दल सर्व नागरिकांचे आभार मानले व येणाऱ्या हिंदू नववर्ष स्वागतयात्रेमध्ये ही असेच हिरीरीने सहभागी होण्याचे आवाहन केले.

## पारनाका गणेश भक्ती मंडळ आणि शिवसेनेच्या वतीने वावेघर येथे मदतीचा हात



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट, वावेघर वाडे यांच्या शैक्षणिक आरोग्य सामाजिक उपक्रमा अंतर्गत त्यांनी मदतीसाठी घातलेली साद आणि पारनाका गणेश भक्ती मंडळ,पारनाका आणि शिवसेना पारनाका(उद्धव बाळासाहेब ठाकरे) सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती यांनी त्यांच्या हाकेला ओ देऊन,नागरिकांकडून जुने पण वापरणेस योग्य कपडे, भांडी, शैक्षणिक साहित्य, डायरेक्ट कॅश देण्याचे आवाहन रविवारी पारनाका गणपती मंदिर येथे येऊन देण्याचं सांगितले आणि त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. ३ मोठे टेम्पो खचाखच भरले आणि २ रिक्षा देखिल भरल्या. वावेघर येथिल स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्टचे सर्वे सर्वा कमलाकर पाटील आपल्या पत्नीच्या सहकाऱ्याने हे काम अतिशय आनंदाने करत असून, त्यांचे निष्ठावान सहकारी देखिल सोबत आहेत. शिवजयंती मध्ये जनते कडे मदतीचे आवाहनकरण्यात आले होते, त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजेश देसाई, दिनेश शेटे, तुषार केळकर, शेखर पातकर, विकास प्रधान, संजय शिर्के, रवी पवार, सोमा कोष्टी आणि अनेक सहकाऱ्यांनी साथ देऊन कार्यक्रम यशस्वी केला.

अनपेक्षित प्रतिसादाने कमलाकर पाटील आनंदाने गहिवरून गेले. त्यांचा सपत्नीक शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांना देखीप शाल श्रीफळ देण्यात आले. गाड्या हास्य मुद्रेने रात्री कल्याणहून वावेघरला रवाना झाल्या.

## कल्याणमध्ये योग्य परवान्याविना प्रवासी वाहतूक



### शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वाहतूक सेनेचा आंदोलनाचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शहरात प्रवाशाच्या मागणीनुसार अनेक खाजगी कंपन्या प्रवासी वाहतूक सेवा देतात. मात्र या चालकाकडे प्रवासी वाहतुकीसाठी लागणारे टी (प्रवासी वाहतूक) परवाना नसल्याचे उद्धव बाळासाहेब ठाकरे वाहतूक सेनेने उघड केले आहे. वाहतूक सेनेच्या पदाधिकार्यांनी कल्याणच्या दुर्गाडी चौकात प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाच्या परवान्याची तपासणी केली असता, या वाहनचालकांकडे एलएमव्ही लायसन्स असल्याचे आढळून आल्याने प्रवाशाच्या जीवाशी खेळ करणाऱ्या या वाहनचालकांवर कारवाई करण्याची मागणी वाहतूक सेनेचे अध्यक्ष निलेश भोर यांनी केली आहे.

खाजगी कंपन्याकडून मिळणारी प्रवासी वाहतूक सेवा स्थानिक रिक्षा चालकाकडून मिळणाऱ्या सेवे पेक्षा तुलनेने स्वस्त आणि किफायतशीर असल्याने प्रवाशाकडून या कंपन्याची सेवा स्वीकारली जाते. मात्र या कंपन्या गरजेनुसार प्रवाशांना सेवा पुरवताना आपल्याकडे नोंदणी करणाऱ्या टॅक्सीसह चारचाकी वाहनचालकांना जबाबदारी देतात. मात्र या चालकाकडे हलकी वाहने चालविण्याचा परवाना असतानाही स्वताची खाजगी वाहने हे चालक प्रवासी वाहतुकीसाठी वापरत असल्याचे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वाहतूक सेनेने चालकाचा परवाना तपासल्यानंतर समोर आले आहे.अशा जवळपास ७ ते ८ वाहन चालकांना पकडून भोर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी वाहतूक पोलिसाकडे सोपवले वाहतूक पोलिसांनी या चालकांना ऑन लाईन दंड ठोठावत लायसन्स बाबत कारवाई करण्याची जबाबदारी आरटीओ ची असल्याचे सांगत त्यांनी हात झटकले. दरम्यान प्रवासी वाहतूक करण्याचा अधिकृत परवाना नसताना आपली खाजगी वाहने चालविण्याच्या परवान्यावर हे चालक वाहने चालवत प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत असल्याने याबाबत ठोस कारवाई करणे गरजेचे असताना आरटीओकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने संताप व्यक्त करत भोर यांनी याबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

## डोंबिवलीत 'त्रिवार जयजयकार रामा' चे आयोजन



### १५ नृत्य संस्था आणि २५० कलाकारांचा सहभाग जागतिक विक्रमात होणार नोंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : एकलव्य आर्ट फोरम कथक नृत्य संस्था, श्री कला संस्कार न्यास आणि मधुकर चक्रदेव एचयुएफ या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रामनवमीचे औचित्य साधून बाबूजी आणि ग.दि. मा. यांच्या गीतरामायणाला 70 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल 'त्रिवार जयजयकार रामा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम 4 एप्रिल रोजी रात्री 8 वाजता सावित्रीबाई फुले नाटयगृहात पार पडणार आहे. या कार्यक्रमात 15 दिग्गज नृत्यसंस्थांचे एकूण 250 कलाकार सहभागी होणार आहे. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे फक्त भारतीय शास्त्रीय नृत्यशैलीद्वारे नृत्यशैली द्वारे निवडक नृत्य गीतरामायणातून श्रीराम चरणी लीन होणारा हा सोहळा असणार आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमाची जागतिक विक्रमात नोंद होणार आहे अशी माहिती कथक नृत्य संशोधक सुनिला पोतदार यांनी दिली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गायक आणि संगीतकार वसंत आजगावकर उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेला एकलव्य संस्थेच्या संचालिका सुनिला पोतदार, श्रीकला संस्कार न्यास संस्थेच्या अध्यक्षा ज्योती दाते बेहरे, मधुकर चक्रदेव एचयुएफ संस्थेच्या अंजली चक्रदेव आदी पदाधिकारी आणि कलाकार उपस्थित होते. या कार्यक्रमात एकलव्य आर्ट फोरम, मंजिरी नृत्यकला मंदिर, विशाखा नृत्यालय, चिदंबरम डान्स अकादमी, नटश्री नृत्यालय, पुरस्कार डान्स अकादमी, पवित्र आर्ट व्हीजुयल इन्स्टिटयूट, सिध्दी नृत्यकला मंदिर, शिवगौरी नृत्यालय, नृत्यम संस्था, श्रीमुद्रा कला निकेतन, लहजा आर्ट फाऊंडेशन, समर्पण कथक कला मंदिर, आवर्तन कथक कला केंद्र, आंगिकम नृत्य संस्था सहभागी होणार आहेत.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024